# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


## प्रेस नोट

**दिनांक ०३/०६/२०२२ (शुक्रवार)**

**(सकाळ)**

---

### घरफोडी

**पो.स्टे. कोंढाळी** :– अंतर्गत ०९ कि. मी. अंतरावरील मौजा जुणापाणी येथे दिनांक ०२/०६/२०२२ चे ००.३० ते ०६.०० वा. सुमारास फिर्यादी नामे– राधेशाम साहेबराव धारपुरे, वय ४२ वर्ष, रा. जुणापाणी ता. काटोल जि. नागपूर यांनी त्यांचे घराचा मुख्य दाराला कुलूप लावून घराचे गच्चीवर आपले परीवारासह झोपायला गेले होते. त्यादरम्यान अज्ञात आरोपीने फिर्यादींचे घराचे मुख्य दरवाज्याची कुलूप कोंडा तोडून रात्रीदरम्यान घराचे आत प्रवेश केला. यानंतर आरोपीने फिर्यादी यांचे बेडरूम मधील ठेवलेल्या कपाटाचे लोखंडी दार वाकवुन कपाटाचा वरच्या कप्यात हॅन्ड बॅग मध्ये ठेवलेले नगदी १,००,०००/–रू. व आलमारीचे लॉकरमध्ये ठेवलेले सोन्या–चांदीचे दागीने किमती ५२,४००/–रू. व एक सॅमसंग कंपणीचा मोबाईल किमंती ८,०००/–रू. असा एकुण कि. १,६०,४००/–रू. चा मुद्देमाल चोरून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. कोंढाळी येथे आरोपीविरुध्द कलम ४५७, ३८० भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस पोउपनि श्री देवेन्द्र सोनावने मो.नं ९६७३५२६१७७ हे करीत आहे.

### चोरी

**१) पो.स्टे. मौदा** :– अंतर्गत २० कि.मी. अंतरावरील परधी पेटोलपंप महालगाव येथे दिनांक ०२/०६/२०२२ चे ००.३० वा. ते ०६.०० वा. सुमारास फिर्यादी नामे–युवराज मधुकर जाधव, वय २६ वर्ष, रा. धनेगाव ता आंजनगाव जि.अमरावती हे दि. ३१/०५/२२ रोजी एफ.के ट्रॉन्सपोर्ट अकोला येथून एमएच–.३०/बीडीं– ३०७४ क्रमांकाच्या पिकअप बुलोरो गाडीने शेतात लागणारी बि–बियाणे व औषधी लोड करुन अमरावती रोडने नागपूरकडे निघाले. दि. ०१/०६/२२ रोजी महालगाव येथे पोहोचले तेथे माल खाली करण्याकरीता गेले असता दुकान बंद असल्याने फियादी पारधी पेटोलपंप च्या आवारात गाडी लावून गाडीच्या कॅबीनच्या ड्रावर मध्ये ३२,०००/–रु. व गाडीचे पेपर ठेवून गाडीचे दरवाजे लॉक करुन चावी सोबत घेवून गाडीच्या समोर १० फुटाच्या अंतरावर झोपले सकाळी अंदाजे ०६.०० वा. गाडीच्या कॅबीनच्या ड्रावरमध्ये ठेवलेले ३२,०००/–रु. पाहीले असता पैसे व आर. सी.बुक दिसले नाही. त्यादरम्यान अज्ञात आरोपीने कॅबीनच्या ड्रावरमध्ये ठेवलेले ३२,०००/–रु. व आर.सी.बुक चोरुन नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. मौदा येथे आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास सहायक फौजदार संजय देशमुख मो.क्र. ९९२२४४७०४५ हे करीत आहे.

**२) पो.स्टे. रामटेक** :– अंतर्गत ०१ कि.मी. अंतरावरील मौजा बस स्टाप रामटेक येथे दिनांक ०२/०६/२०२२ चे १३.४५ वा. ते १४.४५ वा. सुमारास फिर्यादी नामे– सौ.स्नेहा मनिष मेश्राम, वय २८ वर्ष, रा. शहापुर भंडारा ही आपल्या आई व लहान मुलासह रामटेक बस स्टॉप वरून आपल्या घरी गावी जाण्याकरिता रामटेक भंडारा बस मध्ये बसली असता तिच्या जवळ असलेल्या ग्रे रंगाच्या बॅगमध्ये काळया रंगाच्या पर्स मधील सोन्याचे मंगळसुत्र वजन ६ ग्रॅम किमती २५,०००/–रू. व रोख रक्कम १,५००/–रू. असा एकुण २६,५००/–रूपयाचा मुद्देमाल अज्ञात आरोपीने नजर चुकीने चोरून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. रामटेक येथे आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास सहायक फौजदार सदाशिव काठे मो.नं.९८२३०१७४२४ हे करीत आहे.

## मोटरसायकल चोरी

**पो.स्टे. कन्हान** :– अंतर्गत ०७ कि.मी. अंतरावरील वराडा शिवार येथे दिनांक ०२/०६/२०२२ चे ०१.३० वा. ते ०५.०० वा. सुमारास फिर्यादी नामे– सुरज गोपाल तांदुरकर, वय २८ वर्ष, रा. वराडा याने आपली एमएच–४०/सी बी– ५५२० क्रमांकाची मोटरसायकल ही आपल्या घरासमोर हॅन्डल लॉक करून ठेवली असता रात्री दरम्यान अज्ञात आरोपीने फिर्यादीची किमती ७०,०००/–रू. ची मोटरसायकल चोरून नेली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. कन्हान येथे आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास सहारे मो.नं. ९३०९९६६३९२ हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**